# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १२/२००७.** **दिनांक १८.११.२००७**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी ४.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक १८ नोव्हेबर, २००७ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१८२९१-२००७, दि. १२.११.२००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १८ नोव्हेबर, २००७ रोजी दुपारी ४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे |
| ०३. | मा.श्री.उर्मिला प्रदिप जाधव | ०४. | मा.श्री समि खतिब |
| ०५. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | ०६. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ०७. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.रमेश शांताराम साबळे
प्रशासकीय अधिकारी.
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास मा.सदस्यांची वाट पाहून नंतर दुपारी ३.३० वाजता सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष, मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा, मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय, मा.डॉ.पी.एल.तिवारी, यांनी दूरध्वनीवरुन कळविले त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली. तसेच मा.श्री भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, कार्यकारी अधिकारी हे त्यांचे मुलीचा विवाह आज असल्याने हजर राहू शकले नाही, त्याची नोंद घेण्यात आली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांचे हस्ते " श्री साई प्रसादालय " या नवीन प्रसादालय इमारतीचे उद्‌घाटन करणेबाबत.**

**निर्णय क्र.७८०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना मुलभूत सेवा-सुविधा वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येतात. या सेवा-सुविधेतर्गतच श्री क्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या हजारो साईभक्तांना विनासायास व विनाविलंब प्रसाद भोजनाची व्यवस्था उपलब्ध व्हावी म्हणून मा.व्यवस्थापन समितीने भव्य व अद्यायवत सुविधा असलेली "श्री साई प्रसादालय" इमारत बांधणेचा निर्णय घेतला.

**"श्री साई प्रसादालय " इमारती विषयी थोडक्यात माहिती :**

सध्या अस्तित्वात असलेली प्रसाद भोजनाची सुविधा गर्दीच्या काळात अपुरी पडते. श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास, विनाविलंब प्राप्त व्हावी, या दृष्टीने एकाच वेळेस ५५०० भक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशी क्षमता असलेल्या नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम संस्थान मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर ८० व ८५ मधील एकूण ०२ हेक्टर ८५ आर क्षेत्रामध्ये मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार सुरु करण्यात आलेले होते. या इमारतीमध्ये तळमजला व पहिला मजला असून, प्रसाद भोजन बनविणेकामी आवश्यक असणाऱ्या सर्व अद्ययावत सुविधा करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी वाहनतळ, शुध्द पाणी पुरवठा व्यवस्था, उपभांडार गृह, प्रतिक्षागृह, भांडे धुण्यासाठी डिश वॉशिग मशिन, भाजीपाला साठवणुकीसाठी शीतगृहाची सोय, प्रसाद भोजन बनविणेकामी एलपीजी प्लॅन्टची व्यवस्था, सोलर व जनरेटर करीता सुविधा, वायुवीजन व अग्नीशमन व्यवस्था आदि महत्वाच्या सुविधा करण्यात आलेली आहे. तसेच भाविकांसाठी विरंगुळा-विसावा म्हणून बाग-बगीचा व प्रशस्त अंतर्गत रस्तांच्या अंतर्भाव या प्रकल्पांतर्गत करण्यात आलेला आहे.

अशा या भव्य व अद्यायवत सेवा-सुविधा असलेल्या प्रसादालय इमारतीचा उद्‌घाटन समारंभ नामवंत व उच्च पदस्थ व्यक्तीच्या हस्ते व्हावा, अशी मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची इच्छा होती. त्यानुसार मा.अध्यक्षसाो. व इतर मान्यवर सदस्यांनी दिनांक ०३ सप्टेंबर, २००७ रोजी नवी दिल्ली येथे

**76 B**

मा.राष्ट्रपती महोदया यांची समक्ष भेट घेऊन त्यांना श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येण्याचे व नियोजित प्रसादालय इमारतीचे उद्घाटन त्यांचे शुभहस्ते करणेबाबत निमंत्रण दिले होते.

त्यानुसार, मा. राष्ट्रपती भवनाकडून दिनांक ०४ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या पत्रान्वये, मा.राष्ट्रपती यांनी श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनास येण्याची व प्रसादालय इमारतीचे उद्घाटन करण्याची विनंती मान्य केलेली असून, मंगळवार दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १२.१५ वाजेपर्यन्त श्री क्षेत्र शिर्डीसाठी वेळ दिला असल्याबाबत कळविलेले आहे.

मा. राष्ट्रपती भवन व त्यानंतर मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या पत्रानुसार कळविल्याप्रमाणे मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांच्या श्री क्षेत्र शिर्डी भेटीची व प्रसादालय इमारतीच्या उद्घाटन समारंभाची तयारी प्रशासनामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. सदरहू उद्घाटन समारंभासाठी खालील बाबींवर आर्थिक खर्च करावा लागणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली

०१. मंडप, स्टेज, मान्यवर सत्कार खर्च
०२. मंदिर, प्रसादालय इमारत व परिसर विद्युत रोषणाई, पुष्पसजावट खर्च
०३. निमंत्रण पत्रिका व इतर माहितीपत्रके छपाई व वितरण खर्च
०४. मंदिर व भक्तनिवासस्थान इमारत देखभाल व दुरुस्ती खर्च
०५. मंदिर, भक्तनिवासस्थान, नवीन प्रसादालय इमारतीमध्ये तातडीचे सुरक्षा गृह तयार करणेकामी येणारा खर्च.
०६. मंदिर परिसराचे पूर्व बाजुस मा.राष्ट्रपती यांचे मार्गासाठी दक्षिणोत्तर रस्ता तयार करणेकरीता येणारा खर्च.
०७. अहमदनगर-मनमाड रस्ता, निमगांव शिव रस्ता दुरुस्ती खर्च
०८. प्रकल्पांचे संगणकीय डिस्प्ले बोर्ड तयार करणेकामी येणारा खर्च
०९. इतर अनुषंगिक बाबींवर होणारा खर्च (कलाकार, नाष्टा-जेवण, तज्ञ सल्लागार सेवा इत्यादीसाठी )

त्याचप्रमाणे मा.राष्ट्रपती, भारत सरकार, नवि दिल्ली यांच्या दौऱ्यानिमित्त करावयाच्या पूर्वतयारीबाबत खालील बाबींवर चर्चा करण्यात आली.

०१. छायाचित्रण करण्यासाठी स्थानिक फोटो/व्हिडिओग्राफर बरोबरच श्रीरामपूर येथील श्री.गुळस्कर (बजरंग फोटो स्टुडिओ) यांना नेमण्यात यावे.
०२. मंदिर व प्रसादालय परिसरात सुशोभिकरणासाठी रांगोळी काढण्यात यावी.
०३. मा. विश्वस्तांना सर्व कार्यक्रमाचे स्थळावर हजर रहाणेकामी पासेस घेण्यात यावे.
०४. प्रसादालयात मा.राष्ट्रपती यांचेबरोबर मा. विश्वस्तांचे सामुहिकरित्या छायाचित्र काढणेसाठी खुर्च्यांची व्यवस्था करण्यात यावी.
०५. प्रसादालयात मा.राष्ट्रपती यांचे स्वागताचे वेळीच सर्व मा. विश्वस्तांची ओळख करुन देण्यात यावी, तसेच मा.राष्ट्रपती यांचे स्वागतासाठी सर्व मा. विश्वस्तांना बुके देण्यात यावेत.
०६. कोनशिलांवर व निमंत्रण पत्रिकेत सर्व मा.विश्वस्तांची नांवे पूर्ण असावीत तसेच शासनाच्या आदेशातील अनुक्रमांकानुसार मा.विश्वस्तांची नांवे टाकण्यात यावीत. याकामी स्थानिक विश्वस्त मा.डॉ. गोंदकर, मा.श्री.वाबळे, मा.श्री. खांबेकर यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.
०७. मा.राष्ट्रपतींच्या सत्कारप्रसंगी श्री साईबाबांची चांदीची मुर्ती,साडी,साईचरित्र तसेच मुख्यमंत्री व इतर पाहुण्यांना श्री साईबाबांची मार्बलच्या मूर्ती,शाल, इत्यादी देण्यात यावी. श्री साईबाबांचे सोन्याचे नाण्यांचा सेट राष्ट्रपती व मुख्यमंत्र्यांना देणेत यावा.
०८. मा.राष्ट्रपतीच्या कार्यक्रमासाठी परिसरातील जास्तीत जास्त २५० मान्यवरांना निमंत्रीत करण्यात यावे. यामध्ये विद्यमान विश्वस्त,मेडिया,पत्रकार,अहमदनगर जिल्हयातील माजी-आजी खासदार, आमदार, नगरपालिका अध्यक्ष, सर्व कारखान्यांचे अध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष/परिसरातील सदस्य, शिर्डी नगरपंचायतीचे विद्यमान नगरसेवक, माजी विश्वस्त, शिर्डी गांवतील ज्येष्ठ नागरीक इत्यादींचा समावेश असावा. याकामी स्थानिक विश्वस्त मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर व मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.
०९. मा.राष्ट्रपती महोदया यांना सप्रेम भेट देणेसाठी येवला येथून पैठणी खरेदी करण्यात यावी. तसेच दोन-तीन चांगल्या साड्या आणाव्यात (मा.श्रीमती उर्मिला जाधव व मा.श्रीमती सुमित्रा कोते)

**76 C**

१०. कार्यक्रमाचे ठिकाणी स्टेजवरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणेसाठी श्री. सुधीर गाडगीळ अथवा अहमदनगर येथील श्री.अनिल क्षिरसागर अनाऊन्सरची नेमणूक करण्यात यावी.

११. कार्यक्रमाचे ठिकाणी प्रसादालय इमारतीचे आर्किटेक्ट, प्रकल्प सल्लागार, बांधकाम ठेकेदार व इतर यांना सत्कारानिमित्त श्री साईंची मार्बल मुर्ती देण्यात याव्यात. याकामी मा.विश्वस्त श्रीमती उर्मिती प्रदिप जाधव यांचा सल्ला घेण्यात यावा.

१२. या कार्यक्रमाची वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी.

१३. सदरहू कार्यक्रमाचे आभाराचे भाषण मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष यांनी करावे.

वरीलप्रमाणे मा.राष्ट्रपती दौऱ्याबाबत सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे व अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली व कार्यक्रम उत्तमप्रकारे पार पाडणेबाबत सर्वांना सुचना देण्यात आल्या. कार्यक्रमास फारच कमी अवधी शिल्लक असल्याने मंडपासाठी कोटेशन बोलावून मा.कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेऊन कार्यवाही करावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१. मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांचे सुरक्षा अनामत (सिक्युरिटी डिपॉझीट ) बाबत ..**

**निर्णय क्र.७८१.** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दीस देऊन, मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून " सिलबंद निविदा " मागविणेत आल्या होत्या. " सिलबंद निविदा " फॉर्मस् विक्रीची मुदत दि.१८-०१-२००७ पासून ते दि.३०-०१-२००७ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३१-०१-२००७ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत अशी होती. त्याप्रमाणे संस्थानकडे मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून एकूण ३८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी श्री.सिताराम बापू वैद्य या ठेकेदाराचे विनंती वरुन त्यांची निविदा रद्द करणेत आलेली आहे. उर्वरीत ३७ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०२-२००७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१-०३-२००७ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. तसेच त्यादिवशी संबंधीत ठेकेदारांना त्यांचे निविदेतील दरांसंदर्भात चर्चा/वाटाघाटी करणेसाठी उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन सदर दिवशी ३५ ठेकेदार/प्रतिनिधी चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. चर्चा/वाटाघाटीचे वेळी उपस्थित ठेकेदारांना त्यांचे अंतिम सुधारित दर लेखी स्वरुपात देणेबाबत सांगणेत आले. त्याप्रमाणे ३४ ठेकेदारांनी त्यांचे अंतिम सुधारित दर बंद पाकीटातून दिले. सदरची बंद पाकिटे उघडणेत येऊन त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९३ अन्वये मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लि., नासिक यांची अकुशल, कुशल कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांची सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून एक वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेबाबत निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थान समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९३ ला अनुसरुन मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे , मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लि., नासिक यांची अकुशल, कुशल कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांची सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून ते दि.३१-१०-२००८ अखेर एक वर्ष कालावधीसाठी दि.०३-१०-२००७ रोजीचे आदेशान्वये नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी ( इं)लि., नासिक व मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई यांनी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट/काम दि.०१-११-२००७ पासून सुरु केलेले आहे. तथापी, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी दि.०१-११-२००७ पासून अद्याप पर्यंत कंत्राटी पध्दतीने मंदिराबाहेरील विभाग श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व इतर परिसरात सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट/काम सुरु केलेले नाही. त्याऐवजी ऐनवेळी दि.३१-१०-२००७

**76 D**

रोजी फॅक्स लेटर पाठविले. त्यात त्यांनी " , "1) Please refer to your letter No.SSS/WSI 7A /15727/2007 dated 03 October 2007 regarding deposit of additional security deposit of Rs. 3,00,000/- ( Rupees Three Lakh only). It may please be noted that we have already deposited a Security deposit of Rs.1,00,000/- (Rs. One Lakh Only ).

२) We are already providing security service to the Shri Sai Sansthan as a matter of our corporate social responsibility and consider it as a social service. It is for this reason that our services are being provide on no profit basis. On the contrary, we have to incur out of pocket expenditure, which we take in our stride.

३) However, it may be appreciated that we are in no position to deposit any additional security deposit.

४) You are requested to reconsider the matter regarding deposition of additional security deposit and inform us at the earliest " असे म्हटलेले आहे.

मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०७-२००६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५३० अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व परिसराचे सुरक्षेकामी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा सुपरवायझर-०३, सशस्त्र सुरक्षा रक्षक-२१, सुरक्षा गार्ड-५४ असे एकूण ७८ सुरक्षा कर्मचारी दि. १७-०८-२००६ पासून ते दि. १६-०८-२००७ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी पुरविणेबाबत दि.१०-०८-२००६ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे ते दि.१७-०८-२००६ पासून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरवित आहेत. त्यावेळी त्यांनी चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे कंत्राटी कामाची हमी म्हणून रु.१,००,०००/- (रुपये एक लाख ) मात्र सुरक्षा अनामत /सिक्युरिटी डिपॉझीट म्हणून बिनव्याजी संस्थानकडे जमा केलेले आहे.

त्यानंतर दि.१६-०८-२००७ अखेर मुदत संपलेनंतर मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-०७-२००७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.६३० अन्वये दि.१७-०८-२००७ पासून एक वर्ष मुदतवाढ देणेत आलेली आहे व तसे मे. स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना दि.१७-०८-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले आहे. त्याप्रमाणे त्यांचेकडून संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व इतर परिसराचे सुरक्षेकामी दि.१७-०८-२००७ पासून ते दि.१६-०८-२००८ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९३ नुसार मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना मंदिर परीसराबाहेरील इतर विभाग उदा.श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुल, वाहन विभाग, श्री साईनाथ रुग्णालय, कनकुरी तळे व इतर परिसर याठिकाणी सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५७२७/२००७ दि.०३-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले होते. परंतू मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांनी दि.३१-१०-२००७ रोजीचे फॅक्स पत्रान्वये ऐनवेळी आमची एजन्सी सिक्युरिटी डिपॉझीट रु.३,००,०००/- (रुपये तिन लाख) मात्र भरण्याचे परिस्थितीत नाही., तरी त्याबाबत फेरविचार व्हावा असे कळविले आहे. सदर एजन्सीला संस्थानने दि.०३-१०-२००७ रोजी लेखी पत्रान्वये कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी दि.०१-११-२००७ पासून पुरविणेकामी कळविले होते. तेंव्हापासून ते दि.३०-१०-२००७ पर्यंत त्यांनी सिक्युरिटी डिपॉझीट बाबत कुठलीही विचारणा अथवा चर्चा केलेली नव्हती. त्यांची सदरची बाब ही संस्थान प्रशासनास अडचणीत आणणारी आहे. निविदेतील अट व शर्त क्र.१३ प्रमाणे तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१-०३-२००७ रोजीचे सभेतील चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे सदर एजन्सीने कंत्राटी कामाची हमी म्हणून सुरक्षा अनामत (सिक्युरिटी डिपॉझीट) रक्कम रु.३,००,०००/-(रुपये तिन लाख ) मात्र १५ दिवसांचे आंत त्वरीत संस्थानचे लेखाशाखेत रोखीने अथवा डिमांड ड्राफटने जमा करणे आवश्यक असून ते त्यांचेवर बंधनकारक आहे. तसे त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५७२७/२००७ दि.०३-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले आहे.

तथापी, त्यांनी सदर सिक्युरिटी डिपॉझीटची रक्म रु.३,००,०००/-( अक्षरी रुपये तिन लाख ) मात्र संस्थानचे लेखाशाखेत बिनव्याजी जमा न करता दि.३१-१०-२००७ रोजीचे फॅक्स पत्राअन्वये ते सिक्युरिटी डिपॉझीट रु.३,००,०००/- मात्र भरणा करण्याचे परिस्थितीत नाही तरी त्याबाबत फेरविचार करणेत यावा व तसे आम्हांस कळविणेत यावे असे म्हटलेले आहे.

**सबब,** मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए-१५७२७/२००७ दि.०३-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळवून देखील त्यांनी दि.०१-११-२००७ पासून ते अद्याप पर्यंत संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व इतर परिसराचे सुरक्षेकामी कॉन्ट्रॅक्ट/काम सुरु केलेले नाही. तसेच सदर कामाचा चार्ज देखील त्यांनी घेतलेला नाही. त्यांनी कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांना अद्याप पर्यंत ओळखपत्र व युनिफॉर्म देखील दिलेले नाही. सदर एजन्सीचे प्रतिनिधींशी दुरध्वनीवरुन अनेकवेळा त्याबाबत संपर्क साधून देखील, त्यांनी कॉन्ट्रॅक्ट चालू करणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही. त्यांचे सिक्युरिटी डिपॉझीट बाबत मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत निर्णय होणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याबाबत निर्णय होणेस काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कामाची गैरसोय होऊ नये म्हणून, तुर्त दि.०१-११-२००७ पासून ते पुढील आदेश होईपर्यंत मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांचे ऐवजी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व परिसरातील सुरक्षेकरीता कॉन्ट्रॅक्ट चालू करणेकामी आदेश देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०२.** **श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांकरिता रु.७५,०००/- मिळणेबाबत**
**निर्णय क्र.७८२.** श्री.रंभाजी कारभारी बनकर, अध्यक्ष, श्री विरभद्र यात्रा कमिटी, शिर्डी (बिरेगांव बन) यांनी त्यांचे दिनांक २५/१०/२००७ रोजीचे अर्जात विरभद्र (बिरोबा) या दैवताची यात्रा हि दि.२२/११/२००७ ते दि.२४/११/२००७ अखेर बिरोबा बन, शिरडी येथे मोठया थाटात भरणार असून यात दि.२४/११/२००७ रोजी कुस्त्या हंगामाही भरवला जाणार आहेत, या कुस्त्यात भाग घेणा-या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेता रु.७५,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी नम्र विनंती करण्यात आलेली आहे.

कुस्त्यांसाठी म्हणून संस्थानमार्फत फक्त श्री रामनवमी उत्सवातच रु.७५,०००/- इतकी रक्कम देत असते. त्यावेळी संस्थानचे प्रतिनिधी म्हणून लेखाशाखेतील कर्मचारी मदतीसाठी असतात. श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी नियुक्त करुन रक्कम वाटता येईल. मागील वर्षी दि.१४/१०/२००६ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्यावेळचा विषय क्र. १९, निर्णय क्र.८६६ अन्वये संस्थानमार्फत कुस्त्यांसाठी म्हणून रु.५०,०००/- मात्रची रक्कम लेखाशाखेमार्फत वाटण्यात आलेली होती.

तथापि दि२२/११/२००७ ते दि.२४/११/२००७ अखेर होणा-या विरभद्र यात्रेतील रविवार, दि.२४/११/२००७ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हंगामासाठी मागील वर्षाप्रमाणे रु.५०,०००/- (अक्षरी रु.पंन्नास हजार मात्र) देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०३.** **नाताळ सुट्टीतील गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयी करीता मंडप टाकणे बाबत..**
**निर्णय क्र.७८३.** सन २००६ मध्ये झालेल्या दिपावली, नाताळ सुट्टयामध्ये गर्दीचे कालावधीत साईभक्तांची निवासव्यवस्था साईबाबा भक्तनिवासस्थानचे परिसरातील शैक्षणिक संकुल, वाहन तळ, क्रिडांगण, आतिल बगीचा, दक्षिण व पश्चिम वाहन पार्किंग या ठिकाणी आवश्यकतेनुसार शामियाना मंडप गादयांचे सुविधेसह उभारणी करुन साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात आली होती.

त्याच अनुशंगाने साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी खालील प्रमाणे नाताळ सुट्टयांचे कालावधीत दि. २५/१२/२००७ ते दि. ०१/०१/२००८ (**०८ दिवस**) या कालावधीसाठी खालील ठिकाणी शामियाना कापडी मंडप , बाजूचे पार्टीशन (कनाती) सह, खालील बिच्छायतीसह (मॅटीन) व आवश्यक गादयासह मंडप उभारणे करणे बाबद साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी कळविले आहे. तसेच या कालावधी मध्ये मंदिर परिसरात, तसेच प्रसादालय परिसरात व धर्मशाळा परिसरात साईभक्तांचे सोयी करीता खालील ठिकाणी मंडप उभारणी करणे आवश्यक आहे.

**(०१) साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा परीसरातील मंडप :-**

**अ) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर :-**

**76 F**

| अ.नं. | मंडप तपशिल | चौरस फुट | गाद्यांची संख्या नग |
|---|---|---|---|
| ०१ | पार्किंग दक्षिण बाजू ४५'x ३९०' (कनातीसह) | १७,५५०.०० | ७०० |
| ०२ | पार्किंग पश्चिम बाजू ३०'x २१०' (कनातीसह) | ६,३००.०० | २५० |
| ०३ | साईबाबा भक्तनिवासस्थान आतिल बगीचा (लॉन) २००'x २००' (कनातीसह) | ४०,०००.०० | १६०० |
| ०४ | शैक्षणिक संकुल इमारत लॉनवर मध्य भागी ७५'x १५०' (कनातीसह) | ११,२५०.०० | ४५० |
| ०५ | शैक्षणिक संकुल इमारत लॉनवर मागील (पश्चिम) बाजू ९०'x १८०' (कनातीसह) | १६,२००.०० | ६५० |
| ०६ | शैक्षणिक संकुल क्रिडांगण २१०'x ३००' (कनातीसह) | ६३,०००.०० | २५०० |
| **ब) धर्मशाळा परिसर** | | | |
| ०७ | धर्मशाळा कार्यालया समोर ६०'x ४५' ( बिछायत व कनातीसह) | २,७००.०० | |
| ०८ | धर्मशाळा पश्चिम बाजू १००'x १००' (कनातीसह) | १०,०००.०० | ४०० |
| ०९ | साईनगर मैदानावर १००'x १००' (कनातीसह) | १०,०००.०० | ४०० |
| १० | साईनाथ माध्यमिक विद्यालय १००'x ६०'(कनातीसह) | ६,०००.०० | २५० |
| | **एकुण** | **१,८३,०००.००** | **७२००** |

**२) समाधी मंदिर परिसर व प्रसादालय परिसरातील मंडप :-**

| अ.नं. | मंडप तपशिल | चौरस फुट |
|---|---|---|
| ०१ | साईभक्तांचे दर्शन लाईन करीता टेरेसवर मंडप २८०'x १०' | २,८००.०० |
| ०२ | प्रसादालय तिकीट काऊंटर समोर (बिछायतीसह) १५' उंची असलेला जेवण रेलिंग पुर्व / पश्चिम बाजु १२२'X४२' | ५,१२४.०० |
| ०३ | प्रसादालय पार्किंग १२ ते १५ फुट उंची असलेला (बिछायत व कनतीसह)<br>१३०'x ९०'<br>७५'x ३५' | ११,७००.००<br>२,६२५.०० |
| ०४ | साईउदयान (बुफे जेवणासाठी ) ६०'x ४५' बिछायत व कनातीसह | २,७००.०० |
| ०५ | प्रसादालय बुफे करिता ३०'x३०' (कनातीसह) | ९००.०० |
| ०६ | दर्शनरांगेकरिता मंडपाचे | |
| | i. लेंडीबाग ते गेट नं. १ शेजारील बाहेर पडण्याचे गेट १०४'x१०'-०" | १,०४०.०० |
| | ii. पी.आर.ओ. ऑफीस जवळील गेट ते धबधबा (नगर- मनमाड रोड फुट पाथ) १६०'x९' | १,४४०.०० |
| | **एकूण चौ.फुट** | २८,३२९.०० |

**३) भक्तांचे सोयीसाठी तात्पुरते बाथरुम तयार करणे पत्रा पार्टीशन ३०'x४०' साईजचे**

| अ.नं. | पार्टीशन | रनिंग फुट |
|---|---|---|
| ०१ | नविन भक्तनिवास | १००'-०" र.फुट |
| ०२ | साईनगर मैदानावर | १००'-०" र.फुट |
| | एकुण | **२००'-०" र.फुट** |

**४) शिरडी महोत्सवाकरीता स्वागत कमानी (बॉक्स टाईप)टाकणे दि. २९-१२-२००७ ते ०१/०१/२००८ अखेर उंची १८' ते २०' असलेल्या कमाणी.**

| अ.नं. | स्वागत कमाणी | नग |
|---|---|---|
| ०१ | नगर मनमाड रोड (पिंपळवाडी रोड जवळ) लांबी ३० मीटर | ०१ नग |
| ०२ | नगर-मनमाड रोड (नविन भक्तनिवास ) लांबी ३० मीटर | ०१ नग |
| ०३ | स्वागत कक्षाजवळ (लांबी १५ मी.) | ०१ नग |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे नाताळ सुट्टीतील गर्दीसाठी दि. २५/१२/२००७ ते दि. ०१/०१/२००८ अखेर ८ दिवसांसाठी २,११,३२९.०० चौ. फुट शामियाना मंडप व ७,२००.०० नग गादयासाठी तसेच तात्पुरते बाथरुम करिता पत्रा पार्टीशन एकूण २०० रनिंग फुट व शिर्डी महोत्सवाकरीता भक्तांचे स्वागतासाठी स्वागत कमानी (बॉक्स टाईप) ०३ नग उभारणेकामी अंदाजे रु. ११,५०,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

**76 G**

तरी नाताळ सुट्टी निमीत्त दि. २५/१२/२००७ ते दि. ०१/०१/२००८ अखेर २,११,३२९.०० चौ. फुट शामियाना मंडप व ७,२००.०० नग गादया तसेच तात्पुरते बाथरुम करिता पत्रा पार्टीशन एकूण २०० रनिंग फुट व शिर्डी महोत्सवाकरीता भक्तांचे स्वागतासाठी स्वागत कमानी (बॉक्स टाईप) ०३ नग उभारणेकामी तसेच येणारे अंदाजे **रु.११,५०,०००.००** मात्रचे खर्चास तसेच शामियाना मंडप उभारणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, दिनांक २१.१२.२००७ रोजी बकरीद, दिनांक २२.१२.२००७ रोजी चौथा शनिवार व दिनांक २३.१२.२००७ रोजी रविवार अशा सलग सुट्टया येत असल्यामूळै भक्तांची गर्दी दिनांक २१.१२.२००७ पासूनच वाढण्याची शक्यता आहे. त्यामूळे दिनांक २१.१२.२००७ ते दिनांक ०२.०१.२००८ अखेर १३ दिवसाकरीता मंडप उभारणी करण्यास तसेच आवश्यकतेनुसार भाडोत्री गाद्या, चादरी घेणेस त्याचबरोबर भक्तांच्या गर्दीचे प्रमाण पाहून आवश्यकता भासल्यास मंजूर दराने जादा मंडप टाकण्यास व त्यासाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी असे ठरले.

वरील निर्णय क्र.७८० ते ७८३ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी